# ठाणे महानगरपालिकेच्या पाणी बील वसुलीला आला वेग

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ३४
epaper.diwanews.com

**ठाणे :** - ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने थकबाकी आणि चालू बिल वसुलीची मोहीम आक्रमक केली असून गुरूवारी मोठे गृहसंकुल, टॉवर येथे कारवाई करण्यात आली. ब्रम्हांड फेज तीन, लोढा क्राऊन, दोस्ती कोरोना आदी ठिकाणी कारवाई करून एका दिवसात या भागातून ५० लाख रुपयांच्या बिलांची जागेवर वसुली करण्यात आली..(पान २ वर )

www.diwanews.com ♦ सोमवार, २४ मार्च २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# ठाण्यातील रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्यासाठी शिंदेच्या शिवसेनेच्या खासदारांनी घेतली रेल्वे मंत्र्यांची भेट

**ठाणे:** - मुंबई - ठाणे आणि उपनगरातील रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, प्रवाशांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, सेवेचा दर्जा अधिक वृध्दींगत व्हावा, या उद्देशाने कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत विविध मागण्यांचे निवेदन दिले. वैष्णव यांनी प्रश्न सोडविण्याबाबत सकारात्मता दाखवत ॲक्शन प्लॅन तयार करणार असल्याचे आश्वासन दिले.



केंद्रीय रेल्वे मंत्र्याचे शिंदे सेनेच्या खासदारांना आश्वासन

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी लोकसभेत रेल्वे मंत्रालयाशी संबंधित अनुदानित मागण्यांवर चर्चा करतांना ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रवाशांच्या अडचणी आणि त्याचबरोबर नवीन गाड्या सुरु करण्यासंदर्भात विविध मागण्या केल्या होत्या. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेत आपल्या मागण्यांचे सविस्तर निवेदन दिले. महिलांसाठी विशेष लोकल सेवा, स्वच्छ आणि दर्जेदार स्वच्छतागृहे, सर्व स्थानकांवर स्वच्छ आणि दर्जेदार महिला शौचालयांची व्यवस्था करावी, प्रथम श्रेणीतील महिला डब्यांमध्ये बसण्याच्या जागा वाढवाव्यात. सकाळी व रात्री महिला डब्यांमध्ये महिला सुरक्षा रक्षक तैनात करावेत. अपघातग्रस्त प्रवाशांना तत्काळ सरकारी व खासगी रुग्णालयात मोफत उपचार मिळावेत. ठाणे जिल्ह्यातील सर्व रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही बसवावे. रेल्वे उड्डाणपूल व अंडरपास प्रकल्प जलद पूर्ण करावेत. ठाणे आणि मुलुंड च्या स्टेशनच्या दरम्यान एक नवीन स्टेशनच्या कामाला गती द्यावी. स्टेशनवरची वन रुपीज क्लिनिक केंद्रे बंद आहेत ती लवकरात लवकर सुरु करावीत. ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर, कल्याण अशा सर्व ठिकाणी ऑटोमॅटिक जिन्यांची सोय करावी अशा विविध मागण्या खासदार श्रीकांत शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी केल्या.

# राज्यातील उत्तम कार्यामुळे भारतामध्ये वन खात्याचा सन्मान वाढेल -वन मंत्री गणेश नाईक

ठाणे : राज्याचे वनखाते अतिशय उत्कृष्ट काम करीत असून त्यामुळे सबंध भारतामध्ये वनखात्याचा सन्मान वाढेल, असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी वाशी येथे आयोजित वन विभागाच्या पदक वितरण सोहळ्यामध्ये केले.

यावेळी महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल) श्रीमती शोमिता बिस्वास, एम श्रीनिवास रेड्डी, एम श्रीनिवास राव, संजय गौर, विवेक खांडेकर, ऋषिकेश राजन, एस व्ही रामराव, के प्रदीपा, एन.आर प्रवीण आदी मान्यवर उपस्थित होते.

वन मंत्री गणेश नाईक पुढे म्हणाले की, १०० दिवस कृती आराखड्यामध्ये ठरविल्याप्रमाणे वन खात्याने वनांची वाढ करण्याचे इष्टांक पूर्ण केले आहे, ही अभिमानाची बाब आहे. वने ही राज्याची संपत्ती आहे. त्याचे आपण जतन केले पाहिजे. आपण सर्व एक कुटुंब आहोत. आपल्या कर्तव्याला अनुसरून आपण सर्वांनी जोमाने काम केले पाहिजे. आजचा हा पुरस्कार सोहळा आपल्या सर्वांना आत्मविश्वास देणारा आहे. आपल्या शौर्याचा सन्मान करणारा आहे. या पुरस्कारामुळे काम करण्प्रया सर्वांना प्रेरणा मिळणार आहे.

ते म्हणाले की, या सर्वांनी आपल्या कर्तव्याशी जागून आपल्या जीवाची पर्वा न करता कार्य केले आहे. त्यांचा हा सन्मान आहे. २१ मार्च जागतिक वन दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वनांचे रोपण केले पाहिजे, त्यांचे संगोपन केले पाहिजे.

यावेळी त्यांनी सांगितले की, वन विभागातील रिक्त पदांचा आढावा घेवून लवकरच नवीन लोकांची भरती करण्यात येणार आहे. वन खात्याला ज्या ज्या बाबींची गरज आहे त्या सर्व बाबी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन व ?पचे अनावरण करण्यात आले . महसूल व वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी आपल्या मनोगतामध्ये वनखात्याचे कामकाज कशा प्रकारे चालते याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल) प्रमुख शोमिता बिस्वास यांनी केले. यावेळी त्यांनी जागतिक वनदिवस व पुरस्कार सोहळ्याची माहिती दिली.

जागतिक वन दिनानिमित्त वनविभागाच्या पदक वितरण सोहळ्यामध्ये जागतिक वन दिनानिमित्त वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते वनविभागाचा पदक वितरण सोहळा ऑडिटोरियम, सिडको कन्वेंशन सेंटर, सेक्टर-३०, वाशी, नवी मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र वन विभागातील वनसंरक्षणाच्या प्रभावी कामाबद्दल तसेच वन सेवेतील काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांना सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ वर्षाचे पदक वितरण करण्यात आले.

# ठाणे महानगरपालिकेच्या पाणी बील वसुलीला आला वेग

**ठाणे :** - ठाणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने थकबाकी आणि चालू बिल वसुलीची मोहीम आक्रमक केली असून गुरूवारी मोठे गृहसंकुल, टॉवर येथे कारवाई करण्यात आली. ब्रम्हांड फेज तीन, लोढा क्राऊन, दोस्ती कोरोना आदी ठिकाणी कारवाई करून एका दिवसात या भागातून ५० लाख रुपयांच्या बिलांची जागेवर वसुली करण्यात आली.

पाणी बील भरलेले नसल्याने दोस्ती कोरोना सोसायटीचा पाणी पुरवठा सकाळी बंद करण्यात आला. त्या संकुलाच्या पदाधिकाऱ्यांनी आठ लाख ६७ हजार रुपयांचा धनादेश दिल्यानंतर पाणी पुरवठा लगेच सुरू करण्यात आला. त्याचप्रमाणे, बाळकूम येथे लोढा क्राऊन आणि परिसरातील इमारतींवरही कारवाई करण्यात आली. संबंधित वेगवेगळ्या ग्राहकांनी एकूण सुमारे १३ लाख ५१ हजार रुपयांचा बिलाच्या रकमेचे धनादेश दिल्यावर त्यांचा पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

नुकत्याच झालेल्या विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी विविध विभागांच्या महसुलाच्या वसुलीचा आढावा घेतला होता. तसेच, मार्चअखेरपर्यंतचा काही दिवसांचा उपलब्ध कालावधी उपयोगात आणून सर्व विभागांनी त्यांच्या वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश दिले होते. त्यानुसार, पाणी पुरवठा विभागाने उपनगर अभियंता विनोद पवार यांच्या नेतृत्वात वर्तक नगर, लोकमान्य नगर आणि सावरकर नगर, माजिवडा-मानपाडा या प्रभाग समिती क्षेत्रात गुरुवारी वसुली मोहीम राबवली.

**आर्थिक वर्षात १२७ कोटींची वसुली**



**चालू वर्षाचे बिल न भरणाऱ्या तसेच थकबाकीदारांचा पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरु**
**या आर्थिक वर्षात आतापर्यंत १२७ कोटी रुपयांच्या बिलांची वसुली**
**पुढील वर्षी अभय योजना नाही**

पाणी पुरवठा विभागाने या आर्थिक वर्षात आतापर्यंत थकबाकी आणि चालू बिलांच्या २२५ कोटी रुपयांपैकी १२७ कोटी रुपयांची वसुली केली आहे. ही वसुली गेल्यावर्षीच्या याच काळातील वसुलीपेक्षा १२ कोटी रुपयांनी अधिक आहे.

मार्च अखेरपर्यंत थकबाकीसह पाणी बिलाची रक्कम भरणा न करणाऱ्या ग्राहकांचा पाणी पुरवठा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बंद करण्यात येणार असल्याचे उपनगर अभियंता विनोद पवार यांनी स्पष्ट केले.

तसेच, थकबाकीवरील प्रशासकीय आकार / दंड/ व्याज यांच्यावर लागू असलेली १०० टक्के माफीची अभय योजना पुढील वर्षी लागू होणार नाही. या अभय योजनेची मुदत ३१ मार्च, २०२५ पर्यंतच असल्याचेही पवार यांनी सांगितले.

# आला उन्हाळा घराची सुरक्षा सांभाळा !

## उन्हाळ्याच्या सुट्टीत बाहेरगावी जाताना आपले घर सुरक्षित ठेवण्याचे कोपरी पोलिसांचे आवाहन !

**ठाणे** :- उन्हाळा सुरू झाला असून अशातच आता काही दिवसांनी शाळांना सुटी लागणार आहे. त्यामुळे अनेकांनी बाहेरगावी फिरायला जाण्याचे बेत आखले असणार. मात्र फिरण्याच्या आनंदात आपलं घर सुरक्षित राहणार का याची दक्षता घेणं तितकेच महत्वाच आहे. घरफोडी चोरीच्या वाढत्या घटना बघता, घरातील मौल्यवान दागिने बँकेच्या तिजोरीत ठेवणे, घराला सेफ्टी डोअर लावणे, सी सी टीव्ही कॅमेरे बसवणे आजुबाजूच्या लोकांना कुठे जात आहोत आणि घराकडे लक्ष ठेवण्यास सांगणे आदी खबरदारी घेण्याच्या आवाहन कोपरी पोलिसांनी केलं आहे. दहावी बारावीच्या परीक्षा नुकत्याच संपल्या आहेत. पुढच्या काही दिवसात शालेय आणि महाविद्यालयीन परीक्षा आटपणार आहेत. ठाण्यात वाढत्या उष्म्याने ठाणेकर भलतेच हैराण झाले असून, अशा तापमानात राहण्या पेक्षा कुठे थंड हवेच्या ठिकाणी अथवा हवापालट करण्यासाठी जाणार आहेत. मात्र घराला कुलूप लावताना आपल्या घरची सुरक्षा तितकीच महत्वाची आहे. घर बंद असल्याची रेकी करून, चोरटे घरफोडून किमती ऐवज चोरून नेण्याच्या घटना घडल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आपलं घर सुरक्षित राहील या दृष्टीने काही सूचना कोपरी पोलिसांनी केल्या आहेत.

ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशान्वये गुन्हेगारांना पकडण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी गस्त घालून पोलिस आपले कर्तव्य बजावता दिसून. अशातच एक जागरूक नागरिकांची भूमिका ठाणेकरांनी वाजवायची आहे. यामध्ये

बाहेरगावी जाताना आपल्याकडील सोने,चांदीचे दागिने व इतर साहित्य बँक लॉकर मध्ये ठेवणे. लॉकर नसल्यास सोने,चांदीचे दागिने कपाटात न ठेवता इतर ठिकाणी ठेवावेत. सेफ्टी डोअर लावणे. गावी जाताना सेफ्टी डोअरचे लॅच लॉक करणे. बाहेरील कडीला कुलुप लावल्यास घरात कोणी नाही हे माहिती होते.दुधवाला व पेपरवाला यांना दुध व पेपर न टाकण्यास सांगणे. कारण घराबाहेर पेपर पडलेले दिसल्यास घरात कोणी नाही हे समजून येत असल्याचं अशी माहिती कोपरी पोलिसांनी दिली.

ठकुठे बाहेर गावी फिरायला गेलात तआपण बाहेरगावी जात आहोत हे शेजाऱ्यांना सांगून जावे. सोसायटी मध्ये येण्या जाण्याच्या व रस्त्याकडील बाजुस चांगल्या दर्जाचे कॅमेरे, सिक्युरिटी गार्ड ठेवणे व त्यांची चारित्र्य पडताळणी करून घेणे बाहेरगावी गेलो असताना सोशल मीडिया वर फोटो ठेऊ नये. कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास डायल ११२ वर फोन करावा.ठ-

निशिकांत विश्वकार (वरिष्ठ पोलिस निरीक्षक कोपरी पोलीस स्टेशन)

# मामू-भांजे डोंगर, येऊरमधील अतिक्रमणांचा कैवारी कोण?

## आमदार संजय केळकर यांचा अधिवेशनात हल्लाबोल

**ठाणे**:- भारतीय वायुदलाच्या स्थानकाला धोका निर्माण करणाऱ्या हजरत पीर मामू भांजे दर्गा ट्रस्टचे विस्तारित अनधिकृत बांधकाम आणि पर्यावरणासह वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आणणाऱ्या येऊरमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई होऊ नये, यासाठी कोण दबाव आणत आहे, असा प्रश्न उपस्थित करत आमदार संजय केळकर यांनी तात डीने निष्कासन कारवाई करण्याची मागणी अधिवेशनात केली.

बोरिवलीच्या संजय गांधी अभयारण्य हद्दीतील हजरत पीर मामू भांजे दर्गा ट्रस्टने केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबतच्या लक्ष्यवेधीवर बोलताना आमदार संजय केळकर यांनी वनविभाग आणि महापालिका प्रशासन यांच्या हेळसांडपणाबाबत नाराजी व्यक्त केली. मामू भांजे दर्गा ट्रस्टने साडेपाचशे चौरस मीटरहून अधिक क्षेत्रफळावर विस्तारित बेकायदा बांधकाम केले आहे. ५ जुलै २०२३ रोजी वनविभागाने आठ दिवसांत ही बांधकामे हटवण्याबाबत ट्रस्टला लेखी बजावले होते. विशेष म्हणजे या विस्तारित अनधिकृत बांधकामामुळे जवळील भारतीय वायुदलाच्या स्थानकाला देखील धोका पोहोचत असल्याची बाब वायुदल प्रशासनाने वनविभागाच्या निदर्शनास आणून दिली होती. कायदा-सुव्यवस्था आणि राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होऊनही वनविभागाने वेळीच त्यावर कारवाई केली नसल्याची बाब आमदार केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

या अनधिकृत बांधकामाबरोबरच येऊर परिसरात बेकायदेशीरपणे बंगले, हॉटेल, ढाबे, लाउंज उभारण्यात आले असून पर्यावरण आणि वन्यजीव साखळीला धोका निर्माण झाल्याचे श्री. केळकर यांनी सांगितले. याबाबत दरवेळी अधिवेशनात चर्चा होते, कारवाईचे निर्देश दिले जातात, पण कारवाई होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे हजरत पीर मामू भांजे दर्गा ट्रस्ट आणि येऊरमधील बेकायदा बांधकामे यांच्यावर कारवाई होऊ नये या लक्ष्यवेधीला उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी केळकर यांनी मांडलेली बाब सत्य असल्याचे सांगितले. ज्या दिवशी उच्च न्यायालय निवाडा करेल, त्यावेळी कारवाई निश्चित करू, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी येऊरमधील खासगी जमिनीवर झालेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची जबाबदारी वनविभागाची नसून ठाणे महापालिकेची असल्याचेही स्पष्ट केले.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# कचराकोंडी सोडविण्याच्या मागणीसाठी काँग्रेस आक्रमक

## मुख्यालयासमोर ढोल वाजवत अनोखे धरणे आंदोलन

**ठाणे :-** ठाणे महानगरपालिकेमध्ये प्रशासकीय राजवट सुरू आहे. त्यावर संपूर्णपणे राज्यशासनाचे नियंत्रण आहे.महापालिकेत लोकप्रतिनिधी नसल्यामुळे प्रशासन नागरिकांची समस्या ऐकून घेत नसल्याने सर्वसामान्य जनतेला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. ठाणेकर नागरिकांना खड्डेमुक्त मुक्त रस्ते ,पिण्याचे पाणी, घनकचरा यासारख्या मूलभूत सुविधा मिळणे देखील मुश्किल झाले आहे. महापालिकेला स्वत:ची कचराभूमी नाही त्यातच शहरात कचराकोंडी झाल्याने ठाणे काँग्रेसच्या वतीने महापालिका मुख्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते.

या आंदोलनास प्रदेश सरचिटणीस ठाणे प्रभारी चंद्रकांत पाटील, प्रदेश सचिव संतोष केणी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की काँग्रेस पक्ष निवडणुका होवोत अथवा न होवोत सर्वसामान्यांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत राहणार आणि सत्ताधारी आणि प्रशासनाचा भ्रष्टाचार बाहेर काढणार असे ते म्हणाले

यावेळी शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी सांगितले की मागील दहा दिवसापासून शहरातील कचरा पूर्णपणे उचलला गेला नाही.सत्ताधाऱ्यांच्या संगनमताने दहा वर्षाच्या निविदेच नियोजन करणारे प्रशासन दहा दिवसाचा कचरा उचलू शकत नाही हे महानगरपालिकेच तसेच सत्ताधाऱ्यांच अपयश आहे. गेली २५ वर्ष सत्ता असून



कुठलीही ठोस उपाययोजना करू शकलेले नाही त्यामुळे ठाणेकरांच्या आरोग्याशी खेळण्याचा हा प्रकार सुरू असून शहरातील कचराकोंडीचा प्रश्न न सुटल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल म्हणूनच प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महापालिका मुख्यालयासमोर ढोल वाजवत अनोखे आंदोलन करण्यात येत आहे.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी हातात विविध घोषणांचे फलक घेत सत्ताधारी तसेच प्रशासनाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत ढोल वाजवून मुख्यालयाचा परिसर दणाणून सोडला तसेच याबाबत ठाणे महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले यावेळी ठाणे काँग्रेस चे प्रवक्ते राहुल पिंगळे ,महिला अध्यक्ष स्मिता वैती,शिल्पा सोनो ने, सेवादल अध्यक्ष रवी कोळी, महेंद्र म्हात्रे ,हिंदुराव गळवे,शिरीष घरत,निशिकांत कोळी ,स्वप्नील कोळी,युवक काँग्रेस चे आशिष गिरी,विनीत तिवारी,स्वप्नील भोईर,महेश पाटील, जनाबा पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नऊ टक्के रुग्ण काचबिंदूने त्रस्त !

## ठाणे सिव्हील रुग्णालयात काचबिंदू सप्ताह संपन्न

**ठाणे :** - आरोग्य तपासणी करतेवेळी अनेकजण डोळ्यांच्या तपासणीकडे दुर्लक्ष करत असले तरी याचा विपरीत परिणाम डोळ्यांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. डोळ्यांना काचबिंदू झाल्यास प्रथम दर्शनी कोणतीच लक्षणे दिसत नाहीत. मात्र दुर्लक्ष झाल्यास कायमच अंधत्व येण्याचा धोका उद्भवतो. याच पार्श्वभूमीवर ठाणे सिव्हील रुग्णालयात नुकताच काचबिंदू सप्ताहात नऊ टक्के रुग्णांना काचबिंदूची कमी अधिक लक्षणे दिसून आली आहेत.

शरीराच्या नाजूक भागांपैकी एक असणाऱ्या डोळ्यांची काळजी घेणे हे सर्वांसाठी क्रमप्राप्त आहे. सुरुवातीच्या दिवसात डोळ्यांना काही त्रास असेल तर त्याचं निदान करण्यासाठी आज अत्याधुनिक यंत्रणा आहेत. मात्र दुर्लक्ष केल्यास डोळे निकामी होण्याचा दाट शक्यता आहे. यामध्ये डोळ्यांचा काचबिंदू गंभीर आजार आहे. डोळ्यातील अंतस्त्राव बाहेर पडतेवेळी अडथळा निर्माण होतो. त्यानंतर पाणी आत मध्ये साठून राहिल्यावर दाब वाढतो. त्यामुळे डोळ्यांच्या नस खराब होते. कालांतराने डोळ्यांना कमी दिसून कायमचे अंधत्व येत असल्याची माहिती नेत्रतज्ज्ञ डॉ. शुभांगी



अंबाडेकर यांनी दिली.

ठाणे सिव्हील रुग्णालयात नुकताच जागतिक काचबिंदू सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी नेत्र विभागात जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. कैलास पवार, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली २७५ व्यक्तींची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये २३ जणांना काचबिंदूची लक्षणे आढळून आली आहेत. यामध्ये १२ जणांना आयड्रॉपने बरे होऊ शकतील तर एकाच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. या सप्ताहात जिल्हा नेत्रशल्य चिकीत्सक डॉ. संगीता माकोडे, डॉ. प्रसन्नकुमार देशमुख, डॉ. शुभांगी अंबाडेकर, डॉ. गौरी कुलकर्णी, डॉ. कल्पना माले, ज्योती गरड, नम्रता काशीद आदींनी अथक परिश्रम घेतले.

ङ काचबिंदूची लक्षणे पटकन समजून येत नाहीत. हळूहळू अंधुक दिसायला लागत. डोळ्यांना तीव्र वेदना होतात. डोकेदुखी, पोटात मळमळ, लहान मुलांचे डोळे बटबटीत फुगलेले दिसतात. डोळ्यातून सतत पाणी, प्रकाशाकडे बघताना त्रास होतो.

डोळ्यांचा काचबिंदू कोणालाही होऊ शकतो. वयाच्या चाळीशी नंतर प्रत्येकाने डोळे तपासणे आवश्यक आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब किंवा घरात कोकणा काचबिंदू असेल तर अशा व्यक्तींना काचबिंदू होण्याची अधिक शक्यता आहे. काचबिंदूवर आता आय ड्रॉप अथवा लेझर मशिनद्वारे उपचार करता येतात.

# जागतिक जल दिनाच्या निमित्ताने नूतन बांदेकर यांचे सोमवारी व्याख्यान

**महानगरपालिकेची 'विचारमंथन व्याख्यानमाला', पुष्प १५वे**



**ठाणे :-** जागतिक जल दिनाच्या निमित्ताने, सोमवार, २४ मार्च रोजी ठाणे महापालिकेच्या 'विचारमंथन व्याख्यानमाले'त 'तलावांचे ठाणे' या विषयावर लेखिका, तलावांच्या अभ्यासक आणि ठाणे महापालिका शाळेतील शिक्षिका नूतन बांदेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

हे व्याख्यान दुपारी १२.०० वाजता ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे होणार आहे. ते सगळ्यांसाठी खुले आहे. व्याख्यानमालेतील हे पंधरावे पुष्प आहे.

ठाणे हे तलावांचे शहर म्हणून ओळखले जाते. त्या तलावांविषयी माहिती मिळावी तसेच, त्यांच्या संवर्धनासाठी जनजागृती व्हावी यासाठी या व्याख्यानाचे जल दिनाच्या निमित्ताने आयोजन करण्यात आले आहे. नूतन बांदेकर या लेखिका असून त्यांचे चार ललित लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत. तसेच, 'मुक्काम पोस्ट तलाव' हे ठाण्यातील तलावांबद्दल संशोधनात्मक पुस्तक प्रकाशित झाले आहे. काही दैनिकांमध्ये त्या साप्ताहिक सदर लेखन करतात. ठाणे महापालिका शाळा क्र. ५५ येथे त्या प्रभारी मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

विचारमंथन व्याख्यानमाला

ठाणे महापालिकेच्या वतीने महनीय व्यक्तींच्या जयंती तसेच पुण्यतिथीला त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले जाते. तसेच विविध दिनांच्या निमित्ताने कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबरीने, ज्या महनीय व्यक्तींचे स्मरण केले जाते, त्यांचे कार्य व माहिती कळावी, त्यांच्या विचारांचा जागर व्हावा यासाठी 'विचारमंथन व्याख्यानमाले'त मान्यवर व्यक्तींचे व्याख्यान आयोजित केले जाते. या व्याख्यानमालेतील हे पंधरावे पुष्प असून ठाणेकरांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

# कोकणच्या सर्व गाड्यांना दिवा स्थानकावर थांबा मिळावा

## दिवा रत्नागिरी पॅसेंजर ट्रेन पुन्हा दादरपर्यंत सुरू करावी

**नवी दिल्ली :-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेच्या माध्यमातून संपूर्ण देशाला जोडले जात आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या रेल्वे विकासात गेल्या दशकभरात ऐतिहासिक बदल घडले आहेत. ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यानच्या नवीन रेल्वे स्थानकाच्या कामाला गती द्यावी, दिवा-रत्नागिरी पॅसेंजर ट्रेन पुन्हा दादरपर्यंत सुरू करावी, कोकणच्या सर्व गाड्यांना दिवा स्थानकावर थांबा द्यावा, कल्याण-पुणे लोकल करावी, दिवा-वसई लोकल सेवा वाढवावी, रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेल्या स्पेशल ट्रेन मध्ये ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवाव्यात, अशा आणि प्रवाशांना अनेक सोईसुविधा देण्याच्या विविध मागण्या ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केल्या. लोकसभेत रेल्वे मंत्रालयाशी संबंधित अनुदानित मागण्यांवर चर्चा करतांना ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रवाशांच्या अडचणी, सोईसुविधा आणि त्याचबरोबर नवीन गाड्या सुरू करण्यासंदर्भात आग्रही मागण्या केल्या. भारतीय रेल्वे ही फक्त एक प्रवासाची सुविधा नाही, तर ती भारताच्या प्रगतीचा वेग आहे. एक ठाणेकर म्हणून माझ्या मनात या मंत्रालयाबद्दल एक विशेष स्थान आहे. कारण आजपासून सुमारे १७२ वर्षांपूर्वी भारताची पहिली रेल्वे मुंबई ते ठाणे दरम्यान धावली होती. तो ऐतिहासिक क्षण आजही ठाणेकरांच्या आठवणीत जिवंत आहे. आता १७० वर्षांनंतर, देशाची पहिली बुलेट ट्रेनही ठाणे मार्गे मुंबईला जाणार आहे. विशेष म्हणजे मुंबई-ठाणे दरम्यान देशातील पहिली 'अंडर सी टनेल' म्हणजे समुद्राखालून जाणारा बोगदा बांधण्याचं ऐतिहासिक काम सुरू झालं आहे. हे आधुनिक तंत्रज्ञान आजपर्यंत फक्त जगभरात केवळ पाच देशांकडे होतं, पण आता भारतही त्या यादीत सामील झाला आहे. हे शक्य झालं ते पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णवजी आणि संपूर्ण रेल्वे विभागाच्या अथक प्रयत्नामुळे. त्यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी त्यांचे कौतुक केले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वामुळे बुलेट ट्रेनचं काम वेगाने सुरू आहे. पण महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना उद्धव ठाकरे यांनी या प्रकल्पाला 'व्हाइट एलिफंट' (निरुपयोगी प्रकल्प) म्हणून हिणवलं होतं. पण महाराष्ट्राच्या जनतेला 'स्पीड ब्रेकर' नव्हे, तर 'एक्सप्रेसवे' सारखा वेगवान विकास हवा आहे. महाविकास आघाडीचा विकास म्हणजे इंजिन शिवाय धावणारी ट्रेन होती. 'भ्रष्टाचार एक्सप्रेस' गतीने ती धावत राहिली आणि खरा विकास प्लॅटफॉर्मवरच उभा राहिला. आज मोदी सरकारच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती होत असल्याचे खासदार नरेश म्हस्के म्हणाले. महाराष्ट्रातील रेल्वे सेवेला अधिक वेग आणि सुरक्षितता देण्यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेमंत्र्यांकडे विविध मागण्या केल्या. कल्याण-पनवेल (कळंबोली मार्गे) लोकल सेवा सुरू करावी. कल्याण-वाशी (ऐरोली मार्गे) लोकल सेवा सुरू करावी जेणेकरून ठाणे स्थानकावरील प्रवाशांचा भार कमी होईल. ट्रान्स हार्बर मार्गावर ठाणे ते उरण लोकल सेवा सुरू करावी. कल्याण रेल्वे यार्डात जे काम पूर्ण झाले आहे, त्या भागातून लांब पल्ल्याच्या गाड्या चालवण्यास सुरुवात करावी जेणेकरून लोकल गाड्यांची वाट मोकळी होईल आणि होणारा विलंब टाळता येईल. ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि बदलापूरहून महिलांसाठी विशेष लोकल सुरू करावी. सर्व स्थानकांवर स्वच्छ आणि दर्जेदार शौचालयांची व्यवस्था करावी. प्रथम श्रेणीतील महिला डब्यांमध्ये बसण्याच्या जागा वाढवाव्यात. सकाळी व रात्री महिला डब्यांमध्ये महिला सुरक्षा रक्षक तैनात करावेत. अपघातग्रस्त प्रवाशांना तत्काळ सरकारी व खासगी रुग्णालयात मोफत उपचार मिळावेत. कल्याण, ठाणे, डोंबिवली येथे ॲंश स्तराचे अधिकारी नियुक्त करावेत. ठाणे जिल्ह्यातील सर्व रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही बसवावे. रेल्वे उड्डाणपूल व अंडरपास प्रकल्प जलद पूर्ण करावेत. ठाणे आणि मुलुंड स्टेशनच्या दरम्यान नवीन स्टेशनचे काम सुरु आहे हे काम रेल्वे करीत आहे परंतु खर्च ठाणे महानगरपालिका करीत आहे, त्याचा वाढीव खर्च रेल्वेने करावा व अधिकाऱ्यांना तसे निर्देश द्यावेत व नवीन रेल्वेच्या कामाला गती द्यावी. याचबरोबर स्टेशनवरची वन रुपीज क्लिनिक केंद्रे बंद आहेत ती लवकरात लवकर सुरू करावीत. ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर, कल्याण अशा सर्व ठिकाणी ऑटोमॅटिक जिन्यांची सोय करावी, अशा विविध मागण्या खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केल्या.

महाराष्ट्रासाठी २००९-२०१४ मध्ये केवळ रुपये १,१७१ कोटींचं रेल्वे बजेट मिळालं होतं, ते मोदी सरकारच्या काळात तब्बल २० पट वाढून रुपये २३,७७८ कोटींवर पोहोचले आहे. राज्यात २,१५० किमी नवीन रेल्वे मार्ग उभारण्यात आले असून, संपूर्ण रेल्वे नेटवर्कचं १०० टक्के विद्युतीकरण झालं आहे. ११ वंदे भारत गाड्या १९ जिल्ह्याना जोडत आहेत. तर अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १३२ स्थानकांचं नूतनीकरण सुरू आहे. ४७ मोठ्या प्रकल्पांसाठी रुपये १,५८,८६६ कोटींची गुंतवणूक आणि १,०६२ नवीन उड्डाण पूल व अंडरपासेसने महाराष्ट्राच्या रेल्वे विकासाला नवी दिशा दिली जात असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी सांगितले.भारतीय रेल्वे आज ६८,५८४ किमीच्या भव्य जाळ्यासह आणि १२.५ लाख कर्मचाऱ्यांच्या मेहनतीने देशाच्या प्रगतीचा कणा बनली आहे. महायुती सरकारच्या प्रभावी नेतृत्वाखाली, भारतीय रेल्वे जगातील चौथ्या क्रमांकाचं सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क बनले आहे. पण ही केवळ प्रवासाची सुविधा नसून, देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा महामार्ग आहे. लोखंडाच्या रुळांवर धावणाऱ्या गाड्यांमध्ये आता भारताच्या स्वप्नांचा वेग आहे. नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात ही रेल्वे विकसित भारताच्या भविष्यासाठी एक भक्कम आधारस्तंभ ठरली असल्याचे सांगत .

आओ मिलकर देश को बदले,
नई उम्मीदों का संचार करे,
भ्रष्टाचार मिटाकर विकास लाए,
एक विकसित भारत का निर्माण करे।

या शायरीने खासदार नरेश म्हस्के यांनी आपल्या

# घोडबंदर रोडवासीय तिहेरी कोंडीने त्रस्त

## मनोहर डुंबरेंकडून आयुक्तांना साकडे,कायमस्वरुपी दिलासा देण्याची मागणी

**ठाणे :** -रहिवाशी सोसायट्या व रस्त्यांवर ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढीग, दररोजची तीव्र पाणीटंचाई आणि कापूरबावडीपासूनच्या नित्य वाहतूककोंडीमुळे घोडबंदर रोडवासियांची तिहेरी कोंडी होत असून, नागरिक त्रस्त झाले आहेत. या प्रश्नांवर कायमस्वरुपी दिलासा देण्याच्या मागणीसाठी भाजपाचे माजी गटनेते मनोहर डुंबरे यांच्या नेतृत्वाखाली रहिवाशांच्या शिष्टमंडळाने आयुक्त सौरभ राव यांची आज भेट घेतली. त्यावेळी येत्या दोन दिवसांत घोडबंदर रोडवर साचलेला कचरा उचलण्याचे व इतर प्रश्नांवर लवकरच कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. घोडबंदर रोडवरील रहिवाशी सोसायट्या व आस्थापनांच्या माध्यमातून महापालिकेला सर्वाधिक मालमत्ता कर उपलब्ध होतो. तर बिल्डरांकडून दाखल केल्या जाणाऱ्या विकास प्रस्तावांवर आकारल्या जाणाऱ्या शुल्कामुळे महापालिकेची तिजोरी मोठ्या प्रमाणावर भरली जाते. मात्र, महापालिकेला महसूल देणाऱ्या घोडबंदर रोडवासीय प्रामाणिक करदात्यांवर सातत्याने अन्याय होत आहे, याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले. सद्यस्थितीत घोडबंदर रोडवरील नागरिकांना ठिकठिकाणी साचलेला कचरा, तीव्र पाणीटंचाई आणि वाहतूककोंडीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. या तिहेरी कोंडीमुळे नागरिकांचा श्वास कोंडला आहे. गेल्या आठवडाभरापासून या भागातील विविध सोसायट्यांच्या बाहेर व वर्दळीच्या रस्त्यांलगत कचऱ्याचे ढीग साचले आहेत. यापूर्वी दिवाळीआधीही कचरा उचलला गेला नव्हता. त्यामुळे दर सहा महिन्याने उद्भवणाऱ्या घनकचऱ्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी नागरिकांकडून आग्रही मागणी करण्यात आली. गेल्या काही वर्षांपासून घोडबंदर रोडवासियांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. आतापर्यंत पालकमंत्री, खासदार, आमदार, महापौर आदींच्या उपस्थितीत अनेक बैठका झाल्या. दरवेळी गोड बोलून आश्वासने देऊन कागदी घोडे नाचविले जातात. एका बैठकीत ५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा वाढवून देण्याचे आश्वासन दिले गेले होते. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी न करता घोडबंदरवासीयांच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. त्यामुळे या भागातील नागरिकांना पाण्याचे बिल म्हणून दरमहा चार ते पाच हजार रुपयांचा खर्च करावा लागत आहे, याकडे माजी गटनेते मनोहर डुंबरे यांनी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे. मुंबईहून ये-जा करताना घोडबंदर रोडवासियांना दररोज किमान दोन तास वाहतूककोंडीत अडकावे लागते. या परिस्थितीतून दिलासा देण्यासाठी सर्व्हिस रोडचे काम वेगाने करण्याबाबत महापालिकेने पावले उचलून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# नागरी सुविधांचा उडाला बोजवारा
# ठाण्यातील नवी बांधकामे थांबवा
## भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**ठाणे :-** ठाणे शहरातील नागरी सुविधांचा बोजवारा उडाला असून, सामान्य नागरिकांना आवश्यक सुविधा पुरविण्यात महापालिका अपयशी ठरली आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिका हद्दीत नवी व्यापारी संकुले, रहिवाशी इमारती आणि निवासी संकुले उभारण्यासाठी परवानगी देऊ नये, अशी मागणी भाजपाचे माजी गटनेते नारायण पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच ठाण्यातील नागरिकांच्या सध्याच्या हालांची दखल घेण्याची विनंती केली आहे. ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २५ लाखांपर्यंत पोचली असून, ठाणे महापालिकेच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाने ५ हजार ६४५ कोटी रुपयांपर्यंत भरारी घेतली आहे. मात्र, शहरातील नागरिकांना किमान नागरी सुविधा उपलब्ध होत नाहीत, हे दुर्दैवी आहे. नागरिकांना पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, उत्तम रस्ते आदी आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यात महापालिका सातत्याने अपयशी ठरत असल्यामुळे, नव्याने येणाऱ्या नागरिकांची फसवणूक होऊ नये. तसेच सद्यस्थितीत उपलब्ध नागरी सुविधांवरील ताण कमी व्हावा, यासाठी शहरात नव्या बांधकामांना बंदी गरजेची आहे, असे मत नारायण पवार यांनी व्यक्त केले.

शहरातील भूमाफियांकडून मिळेल त्या जागी बेकायदा इमारती उभारल्या जात आहेत. त्यात सामान्य नागरिकांना फसवणूक करून घरे दिली जात आहेत. गेल्या ४२ वर्षात ठाणे महापालिका स्वतंत्र धरण उभारू शकलेली नाही. त्यामुळे तीव्र पाणीटंचाई भासत असून, घोडबंदर रोड, दिवा भागाबरोबरच मुख्य शहरात दूषित पाण्याची विक्री करून नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळला जात आहे. शहरातील अनेक भागात वाहतूककोंडी भेडसावत असून, मुख्य रस्ते व चौकांमध्ये फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. या फेरीवाल्यांवर कारवाईसाठी महापालिका प्रशासनाकडून टाळाटाळ केली जाते.

शहरात तीव्र पाणीटंचाई असतानाच, गेल्या आठवडाभरापासून ठाणे शहराच्या कानाकोपऱ्यात कचऱ्याचे ढीग पडून आहेत. राज्य सरकारने ठाणे महापालिकेला घनकचरा व्यवस्थापनासाठी १८ एकर जागा दिली. परंतु, त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्था करण्यात महापालिका प्रशासन असमर्थ ठरले. ठाणे शहरातील नागरिकांसाठी सक्षम आरोग्यवस्था उपलब्ध नाही. महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील कारभाराचा बोजवारा उडाला आहे. रुग्णालय 'कोमातठ गेले असून, सातत्याने वैद्यकीय कर्मचाऱ्यांची मागणी करूनही महापालिका प्रशासनाकडून रिक्त पदे भरली जात नाहीत, असे श्री. नारायण पवार यांनी पत्रात म्हटले आहे. या परिस्थितीमुळे ठाणे शहरातील नागरिक हैराण झाले आहेत. अशा परिस्थितीत ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या आणखी वाढल्यास नागरी सुविधांवर मोठा ताण येईल. त्यामुळे प्रामाणिकपणे करभरणा करणाऱ्या नागरिकांना हालअपेक्षांना तोंड द्यावे लागेल. त्यामुळे सद्यस्थितीत ठाणे शहरातील नागरिकांना परिपूर्ण नागरी सुविधा मिळेपर्यंत, ठाणे महापालिका क्षेत्रात नव्या बांधकामांना परवानगी देऊ नये. तसेच सुरू असलेली बेकायदा बांधकामे तत्काळ तोडण्यासाठी योग्य निर्देश द्यावेत, अशी मागणी नारायण पवार यांनी पत्रात केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाच्या शहराध्यक्षांनी टाकला ठामपा मुख्यालयासमोर कचरा



**ठाणे :-** ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यावर मात करण्यात ठाणे पालिकेला यश येत नाही. त्यामुळे शहरातील अनेक सोसायट्यांच्या दारात कचऱ्याचे ढीग लागले आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुहास देसाईयांनी ठाणे पालिका मुख्यालयासमोर कचरा टाकला. शहरातील अनेक भागातून मागील दहा दिवसापासून कचरा पूर्णपणे उचलला गेलेला नाही.ठाणे महापालिका क्षेत्रातील कचरा सीपी तलाव कचरा संकलन केंद्रात नेला जातो. त्यानंतर तो डायघर व शहरातील मोकळ्या भूखंडावर टाकला जातो. परंतु सीपी तलाव येथे कचऱ्याला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर कचरा टाकण्यास विरोध दर्शवत स्थानिकांनी आंदोलन केल्यामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे. ठाणे शहरातील कचरा उचलला जात नसल्याने रस्त्या रस्त्यावर तसेच सोसायट्यांबाहेर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. ही समस्या सुटली जात नसल्याने देसाई यांनी आपल्या घरात साचलेला कचरा गोणीत भरून पालिकेसमोर आणून टाकला.दरम्यान, महापालिकेत कित्येक वर्षापासून असलेल्या सत्ताधाऱ्यांनी स्थानिकांना वेळोवेळी आश्वासने देण्याव्यतिरिक्त कुठलीही ठोस उपाययोजना केलेली नाही व त्यांच्याच नाकर्तेपणामुळे महापालिकेला स्वत:ची कचराभूमी नाही. आज मी माझ्या घरातील कचरा इथे टाकला आहे. जर लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावला नाही तर पालिकेच्या प्रत्येक मजल्यावर कचऱ्याचे ढीग उभे करू, असा इशारा सुहास देसाई यांनी दिला.

# वीज पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून नवीन प्रकल्प कार्यान्वित होणार


**मुंबई :-** राज्यातील वीज निर्मिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून टप्प्याटप्प्याने नवीन प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. तसेच भविष्यात वीज पुरवठा अधिक सक्षम केला जाईल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत सांगितले.

राज्यात महानिर्मितीचे पाच संच बंद असल्याने विजेचा तुटवडा निर्माण होत असल्याबद्दल सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या. राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, वीज निर्मिती संच बंद असण्याची ही पहिली वेळ नसून नियमित देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी काही संच बंद ठेवावे लागतात तसेच तांत्रिक बिघाडांमुळे काही संच बंद राहतात. प्लान्ट लोड फॅक्टर (इफ्ट) बाबत महाराष्ट्राचा दर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च

### ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

दर आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार २०३० पर्यंत काही जुने प्रकल्प चालू ठेवण्याची गरज आहे. त्यामुळे सरकार आणि खासगी वीज निर्मिती कंपन्यांची तुलना योग्य नाही, असे त्यांनी सांगितले. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी स्पष्ट केले की, जानेवारी महिन्यात ८२.५ दशलक्ष युनिट वीज खरेदी करण्यात आली असून तिचा दर ३.३१ रुपये प्रति युनिट होता. हा दर खासगी कंपन्यांच्या तुलनेत अधिक नव्हता. तसेच, सरकारकडील जुने वीज प्रकल्प टप्प्याटप्प्याने नव्या तंत्रज्ञानाने अद्ययावत केले जात आहेत. भुसावळ येथे ६६० मेगावॅटचा नवीन प्रकल्प कार्यान्वित होत असून, चंद्रपूरमध्ये ८०० मेगावॅटचा प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

# आर्यन देवळेकर यांची भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी नियुक्ती



### पीपल्स एज्युकेशन सोसायटी शाळेचा वतीने आर्यनचा सन्मान

ठाणे : ठाणे पूर्व येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटी शाळेचा विद्यार्थी आर्यन देवळेकर याची भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी नियुक्ती झाल्याबद्दल शाळेच्या वतीने आर्यनचा शुक्रवारी सन्मान करण्यात आला.

ठाणे पूर्वेत राहणार २२ वर्षीय आर्यन देवळेकर याने केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पास झाले.त्यानंतर चेन्नई येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करून ८ मार्च रोजी आर्यन याची आसाम रेजिमेंट येथे लेफ़्टनंट पदावर नियुक्ती झाली आहे. हि बाबा शाळेसाठी अभिमानाची असल्याने ठाणे पूर्व येथील पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या वतीने लेफ़्टनंट आर्यन देवळेकर याचा शुक्रवारी सन्मान करण्यात आला.यावेळी पी. ई. सोसायटी इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका भारती यादव, पी. ई. सोसायटी इंग्लिश मीडियम हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक दादा कर्णवर आणि सोसायटीचे आजीव सभासद रेखा वाघ,कुमार आर्यन देवळेकर यांचे पालक हर्षद देवळेकर आणि मानसी देवळेकर आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुलांना मार्गदर्शन करताना लेफ़्टनंट आर्यन देवळेकर म्हणाला कि मुलांनी स्वप्न बघितले पाहिजे कारण स्वप्न नक्की पूर्ण होतात मी देखील असेच स्वप्न पहिले आणि परिश्रम घेतले आणि आज लेफ़्टनंट झालो. सुरुवातीपासूनच शाळेच्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांची साथ मिळाली म्हणून मी माझे स्वप्न पूर्ण करू शकलो असे सांगून शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# औरंगजेबाचे गोडवे गाणारे देशद्रोहीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा घणाघात

## डोंबिवलीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण

**डोंबिवली:** औरंगजेब हा महाराष्ट्राचा घास घेण्यासाठी आला होता. पण छत्रपती शिवाजी महाराज एक दैवी शक्ती होते. औरंगजेबाने संभाजी महाराजांप्रती क्रुरता दाखवली. या औरंगजेबाचे गोडवे काही लोक गातात. हे गोडवे गाणारे देशद्रोहीच आहेत, असा घणाघात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. डोंबिवली पूर्वेत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण सोहळ्याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा एक तरी गुण प्रत्येकाने अंगिकारला पाहिजे. हीच छत्रपती शिवाजी महाराज यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही प्रतिपादन एकनाथ शिंदे यांनी केले. या सोहळ्याला हजारोंच्या संख्येने डोंबिवलीकर उपस्थित होते.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून डोंबिवली पूर्वेतील घारडा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण सोमवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. दिमाखदार सोहळ्यात या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी हजारो डोंबिवलीकरांनी याची देही याची डोळा हा सोहळा अनुभवला. या सोहळ्यासाठी दुपारपासूनच अबाल वृद्धांनी घारडा चौकात गर्दी केली होती. यावेळी हा चौक यापुढे घारडा सर्कल नाही तर छत्रपती शिवाजी महाराज चौक या नावाने ओळखला जाईल, असे यावेळी एकनाथ शिंदे यांनी घोषित केले. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. अखंड हिंदुस्थानचा अभिमान म्हणजे शिवछत्रपती, हिंदुत्वाचा हुंकार म्हणजे शिवछत्रपती. लोकशाहीचा अविष्कार म्हणजे शिवछत्रपती, शिवछत्रपती म्हणजे पराक्रम, शिवछत्रपती म्हणजे धैर्य, शिवछत्रपती म्हणजे शौर्य, शिवछत्रपती म्हणजे त्याग, शिवछत्रपती म्हणजे समर्पण, शिवछत्रपती म्हणजे दूरदृष्टी, शिवछत्रपती




म्हणजे निती, शिवछत्रपती म्हणजे युगपुरूष, शिवछत्रपती म्हणजे प्रवर्तक, शिवछत्रपती म्हणजे रयतेचा राजा अशा शब्दात शिंदे यांनी महाराजांची थोरवी गायली. या पुतळ्याची रचना वेगळी आहे. छत्रपती शिवाजी महाराज पूर्णपणे जनतेला दर्शन देताना या पुतळ्यात दिसतात असे सांगत त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि त्यांच्या टीमचे अभिनंद केले. हा पुतळा पुढील पिढ्यांना इतिहासाची आठवण करून देत राहिल. तरूण पिढी, मुलांना उर्जा देत राहील. डोंबिवलीकर शिवभक्तांना या पुतळ्यातून प्रेरणा मिळेल, असेही शिंदे यावेळी म्हणाले.

आपले सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर चालणारे सरकार आहे. विकासाला पुढे नेणारे, लोकाभिमुख योजना राबवणारे हे सरकार असल्याचेही शिंदे यावेळी म्हणाले. औरंगजेब महाराष्ट्राचा घास घ्यायला आला होता. औरंगजेबाने संभाजी महाराजांप्रती क्रुरता दाखवली. त्याचे समर्थन करणारे देशद्रोहीच आहेत असे यावेळी शिंदे म्हणाले. प्रत्येकाने महाराजांच्या गुणांपैकी एक तरी गुण अंगिकारला पाहिजे. हीच महाराजांना खरी श्रद्धांजली ठरेल, असेही यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर एक काव्य सादर करत त्यांच्या पराक्रमाची थोरवी गायली. यावेळी हिंदुराष्ट्र सेनाप्रमुख धनंजयभाई देसाई, समाजप्रबोधनकार ह.भ.प. संग्रामबापू भंडारे महाराज, जगन्नाथ पाटील, आमदार राजेश मोरे, गोपाळ लांडगे, महापालिका आयुक्त इंदुराणी जाखड यांच्यासह हजारो डोंबिवलीकर, शिवभक्त, शिवसेनेने पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासकाने सदनिका ढापल्या; म्हाडा, पालिकेने नाही पहिल्या!

## ठामपातील शेकडो कोटींच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा आ.संजय केळकर..

**ठाणे:-** ठाण्यातील एका विकासकाने म्हाडाला ३१ सदनिका न देता त्या गिळंकृत केल्या असून त्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, मात्र गेल्या तीन वर्षांत त्यावर कोणतीही कारवाई महापालिका आणि म्हाडा प्रशासनाने केली नसल्याचा आरोप करत आमदार संजय केळकर यांनी ते महापालिकेतील शेकडो कोटींच्या भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी अधिवेशनात केली. ठाणे शहरातील विविध समस्या तसेच महापालिकेतील भ्रष्टाचार यावर आमदार संजय केळकर यांनी जोरदार आवाज उठवत चौकशी आणि कारवाईची मागणी केली. ज्या विकासकांनी चार हजार चौरस मीटरच्यावर बांधकामे केली आहेत, त्यांनी त्यावर २० टक्के क्षेत्रफळाच्या सदनिका म्हाडाला देणे बंधनकारक आहे. मात्र ठाण्यातील दर्शन सागर डेव्हलपर या विकासकाने अद्याप ३१ सदनिका म्हाडाला दिलेल्या नाहीत. याबाबत कासारवडवली पोलिस ठाण्यात २० मार्च २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र गेल्या तीन वर्षांत महापालिका आणि म्हाडा प्रशासनाने विकासकावर कोणतीही कारवाई अद्याप का केली नाही असा प्रश्न उपस्थित करत आमदार संजय केळकर यांनी दोन्ही प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला. ठाणे महापालिकेला विविध मार्गांनी विविध विकास कामांसाठी ७००-८०० कोटींचा निधी मिळाला. मात्र ही कामे झाली का? कामे न दाखवता बिले काढण्यात आली का? असे प्रश्न श्री.केळकर यांनी सभागृहात उपस्थित केले. महापालिकेत शेकडो कोटींचा भ्रष्टाचार झाला असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केल्याची माहिती त्यांनी दिली.

सफाई कामगारांना वारसा हक्काने नोकरीचा लाभ मिळावा यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आले, परंतु अद्याप सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी देताना अडवणूक होत असल्याची बाब



श्री.केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. फायलेरिया विभागात देखील हा लाभ मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. कोव्हिड काळात जीवावर उदार होऊन सफाई कर्मचाऱ्यांनी काम केले, त्यांचा भत्ता देखील त्यांना मिळाला नसल्याची बाब श्री.केळकर यांनी निदर्शनास आणून दिली.

ठाण्यात सध्या प्रत्येक विभागात कचरा पडून आहे. घनकचरा समस्या गंभीर झाली आहे. शहरात दोन दोन मंत्री असताना हा प्रश्न का उद्भवावा असा प्रश्न उपस्थित करत श्री.केळकर यांनी लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी चर्चा करून यातून मार्ग काढण्याची सूचना केली.

रस्ता रुंदीकरणात गेल्या १० ते १५ वर्षांपासून बाधित नागरिक हक्काच्या घरांपासून, गाळ्यापासून वंचित आहेत. तर दुसरीकडे चुकीच्या लोकांना याचा लाभ मिळाला आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी श्री.केळकर यांनी केली. एकीकडे बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असताना दुसरीकडे गृहसंकुलांच्या आवारात असलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याची जबाबदारी सोसायट्यांवर टाकण्यात आली आहे. हा खर्च सोसायट्यांना झेपणारा नसून महापालिकेने चार ते पाच कोटी रुपयांची तरतूद करून ही छाटणी करावी, अशी मागणी श्री.केळकर यांनी केली. तर वेदरशेड प्रश्न अद्याप प्रलंबित असून शहरातील सुमारे ७० - ७५ सोसायट्यांनी याबाबत अर्ज दिले आहेत. इमारतींचे आयुष्यमान वाढावे यासाठी ही वेदरशेड नियमित करावीत, अशी मागणी श्री. केळकर यांनी अधिवेशनात केली.

# औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी शिवसेना आमदार आक्रमक



विधान भवनाच्या पाय्रयांवर जोरदार घोषणाबाजी करत शिवसेनेचे आंदोलन

**मुंबई** :- छत्रपती संभाजी महाराजांचा क्रूर छळ करण्र्या औरंग्याची कबर हटवण्यासाठी शिवसेना आमदारांनी आज विधान भवनातील पाय्रयांवर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. या आंदोलनात मंत्री भरत गोगावले, मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार विजय शिवतारे, आमदार संतोष बांगर, आमदार आमदार डॉ. मनीषा कायंदे, आमदार संजय गायकवाड यासह अनेक आमदार उपस्थित होते.

औरंग्याचा धिक्कार करत शिवसेना आमदारांनी कबर हटवण्याची मागणी केली. औरंग्याची कबर हटवून तिथं केवळ थडगं ठेवा. थडग्याजवळ चार जोडे ठेवावेत म्हणजे येणारे जाणारे थडग्याला जोडे मारतील, अशी टीका मंत्री भरत गोगावले यांनी केली. औरंग्याचे उदात्तीकरण करण्र्यांना हिंदुस्थानात राहण्याचा अधिकार नाही अशी टीका आमदार संतोष बांगर यांनी केली.शंभू राजांचा अमानूष छळ करण्र्या औरंग्याची कबर उखडून टाका असे बॅनर यावेळी शिवसेना आमदारांनी यावेळी झळकवले.

# शासकीय रुग्णालयांतील औषध तुटवड्याच्या तपासणीसाठी लोकप्रतिनिधींची समिती

## वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई**:- राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या शासकीय रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा किती आहे याचा तपशीलवार अहवाल तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठीत करण्यात येईल. ही समिती १५ दिवसांत अहवाल सादर करेल असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य काशिनाथ दाते यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अजय चौधरी, योगेश सागर, अमित देशमुख, नाना पटोले, देवयानी फरांदे, रोहित पवार यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागातील रुग्णालयांना लागणारी औषधे व यंत्रसामग्री खरेदी २०१७ - १८ या वर्षापासून शासकीय रुग्णालयात हाफकीन संस्थेमार्फत करण्यात येत होती. हाफकीनच्या माध्यमातून होण्र्या औषध खरेदीबाबत अनेक तक्रारी आल्यामुळे सन २०२३ पासून वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून या प्राधिकरणाकडून औषधे व यंत्रसामग्री खरेदी केली जात आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत हाफकिन महामंडळाला २६५३.७७ कोटी निधी मंजूर केला. त्यापैकी रु. १३१८.२४ कोटी खर्च झाले तर ९५७.१२ कोटी परत करण्यात आले. उर्वरित ३७८.४० कोटींपैकी २९६.०० कोटी प्रलंबित देयके तसेच सुरू असलेल्या खरेदीसाठी वापरण्यात येणार आहेत, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

# रक्तदान हेच श्रेष्ठ दान

ठाणे:- असे म्हणतात की, एका व्यक्तीने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच असे मानले जाते. ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागण्र्या रक्ताचा तुटवडा भासत असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे. तरी, इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. नागरिकांनी जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी गिरीश चौधरी (९८६९६८५२८२) यांच्याशी संपर्क साधावा

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्ण
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्ण
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076

# तीव्र उन्हाळ्यापासून बचाव करण्यासाठी जाळीचे आच्छादन

**ठामपाचा प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम**

ठाणे : सध्या तीव्र उन्हाळा सुरू असल्याने वाहन चालकांना सिग्नलच्या प्रतिक्षेत उभे असताना उन्हाचा त्रास जाणवू नये, म्हणून ठाणे महानगरपालिकेतर्फे प्रायोगिक तत्वावर गोखले रोड वरून तीन हात नाक्याकडे जाणाऱ्या मार्गिकेवर जाळीचे आच्छादन टाकण्यात आले आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात येत आहे. गोखले रोड वरील ही जाळी १०० फूट लांब, २५ फूट रुंद असून तिची उंची रस्त्यापासून २० फूट एवढी आहे. या जाळीमुळे वाहन चालकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल. आणखी काही ठिकाणी अशाप्रकारे जाळी उभारण्याचा ठाणे महानगरपालिकेचा मानस आहे

# नौपाडा पोलिसांनी परत केले १०१ मोबाईल फोन

ठाणे: मागील दोन वर्षात नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ झालेले विविध कंपनीचे तब्बल १०१ मोबाईल फोन यांचा शोध घेऊन ते फोन त्या- त्या मोबाईल धारकांना परत करण्यात पोलिसांना यश आले. हे मोबाईल फोन शनिवारी हस्तांतरण करण्यात आले आहेत.२०२३ ते मार्च २०२५ या दरम्यान नौपाडा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तक्रारदारांचे गहाळ झालेले मोबाईलचा नौपाडा पोलीस स्टेशन मधील सायबर कक्षाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे विविध कंपन्यांचे एकूण १०१ मोबाईल फोन शोधून काढले. त्यानंतर ते परत तक्रारदारांना केले आहेत.

# कन्व्हेंशन सेंटर आणि प्रेक्षक गॅलरी या प्रकल्पात रस असलेल्या विकासकांकडून स्वारस्य देकार सूचना मागवणार

ठाणे : ठाणे महानगरपालिकेतर्फे कासारवडवली येथे खारबाव आणि कोस्टल रोड जंक्शन परिसरात सुमारे ७० एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या कन्व्हेंशन सेंटर आणि प्रेक्षक गॅलरी (व्यूईंग टॉवर) या प्रकल्पात रस असलेल्या विकासकांसाठी स्वारस्य देकार सूचना (इओआय) प्रकाशित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

कोट्यवधी रुपयांच्या या प्रकल्पासाठी आर्थिक व्यवहाराचे कोणते प्रारूप स्वीकारायचे याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. अशा प्रकारचा प्रकल्प यापूर्वी झालेला नसल्याने त्याची दिशा, नियोजन, व्यवस्थापन आणि देखभाल यांचे स्वरुप कसे असावे, हे अत्यंत काटेकोरपणे आखण्याची गरज असल्यानेच ठाणे महानगरपालिका स्वारस्य देकार सूचना मागवण्याचे ठरविले असल्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून आकाराला येत असलेल्या या कन्व्हेंशन सेंटर आणि प्रेक्षक गॅलरी प्रकल्पाच्या आराखड्याचा आढावा आयुक्त राव यांनी गुरुवारी घेतला. त्याचबरोबर, ठाणे महापालिका क्षेत्रात प्रस्तावित असलेले कोलशेत-बाळकूम येथील टाऊन पार्क, कळव्यातील यशवंत रामा साळवी तरण तलावाची नव्याने बांधणी, खारेगाव येथे प्रस्तावित नवीन नाट्यगृह याही प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. बैठकीस, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त शंकर पाटोळे, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार दिनेश पैठणकर, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शहर विकास विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या प्रकल्पात खाजगी-सार्वजनिक सहभाग किंवा विकासकाच्या माध्यमातून बांधकाम असे दोन पर्याय आर्थिक सल्लागारांनी सुचवले आहेत.

